**MHAH180015742022**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक.**
**४३६/२०२२**
भाऊसाहेब पुंजा पवार
विरुध्द
छाया नंदा घाणे व इतर

**निशाणी क्रमांक ०७ खालील आदेश**

प्रस्तुत अर्ज वादीने कोर्ट कमिशनर नेमणूकीसाठी केलेला आहे. वादीने माहे मार्च सन २०२२ मध्ये प्रतिवादी नं.१ ते ३ यांची समक्ष भेट घेवुन सर्वांनी मिळुन मुळ गट नं.३०/२ क्षेत्र ० हे ८७ आर +पो.ख. ०हे ५३ ची फाळणी मोजणी करुन घेण्याची विनंती केली असता प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला व तुझी जमीन तु मोजुन घे, असा सल्ला दिला. वादीचे क्षेत्राचे पुर्वेस दक्षिणोत्तर रस्ता आहे. वादीचे क्षेत्राचे पश्चिमेस प्रतिवादी नं.१ ची व वादीचे क्षेत्राचे उत्तरेस प्रतिवादी नं.३ ची मिळकत आहे. परंतु आज रोजी प्रतिवादी नं. १ व ३ चे वहीवाटीमुळे वादीचे क्षेत्र नाममात्र राहीले असुन खाजगी मोजणी केली असता वादीचे क्षेत्र प्रत्यक्षात ७ x १२ भरत नाही. त्यामुळे वादी यांनी उप-अधिक्षक, भूमी अभिलेख राहुरी यांचेमार्फत गट नं.३०/२ ची फाळणी मोजणी होवुन वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीच्या दिशा, सिमा, हद्दी करुन खुणेचे दगड रोवुन ७ x १२ क्षेत्राप्रमाणे बांध बंधीस्ती होवुन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. यासाठी उप-अधिक्षक, भूमी अभिलेख राहुरी यांची कमिशनर म्हणून नेमणूक करण्यांत यावी व त्यांनी वाद जागेची मोजणी करून नकाशासह अहवाल सादर करणेबाबत त्यांना सूचना देण्यात यावी, अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

२. प्रतिवादी नं.१ व २ यांनी निशाणी नं.१८ वर त्यांची कैफियत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द एकतर्फा आदेश दि.१७/०७/२०२३ नि.१ वर आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी नं.१ व २ यांनी दावा मिळकतीच्या हद्दी ठरविण्यास कोणतीही हरकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांनी मात्र प्रस्तुत अर्जाला विरोध दर्शवुन, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीचा व प्रतिवादी नं.१ व २ यांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादी नं.१ व २ यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले.

४. वादीने प्रस्तुतचा दावा हा मनाई हुकूम तसेच दावा मिळकतीच्या हद्दीखुणा कायम करण्यासाठी तसेच प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला

आहे. वादीने त्याच्या दाव्यामध्ये प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे व सदरील अतिक्रमण काढुन घेण्याबाबत कोणतीही विनंती केलेली नाही. वादीची अतिक्रमण काढण्यासंदर्भात विनंती नसल्यामुळे फक्त हद्दीखुणा कायम करण्यासाठी कोर्ट कमिशनरची नेमणुक केल्या जावु शकते का, असा प्रश्न उपस्थित होतो. वादीच्या विधिज्ञांनी त्याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालयाचे ***डॉ.यशवंत खोसे वि.नामदेव गोरे [रिट पिटीशन क्र.४९८५/२०१६ (खंडपीठ-औरंगाबाद)]*** व मा.ओडीसा उच्‍ न्यायालयाचे ***संकु रंगा राव वि. देविप्रसाद साहु [ए.आय.आर.१९८९ ओडीसा २१]*** हे दोन न्यायनिवाडे दाखल केले आहेत. वादीच्या विधीज्ञांनी दाखल केलेल्या दोन्ही न्यायनिवाडयामध्ये मा. उच्‍ न्यायालयांनी त्या विशिष्ट वस्तुस्थितीचा विचार करुन कोर्ट कमिशन नेमण्याचा आदेश पारीत केलेला आहे. परंतु, दोन्ही न्यायनिवाडयामधील वस्तुस्थिती ही प्रस्तुत दाव्यामधील वस्तुस्थितीशी विसंगत आहे. त्यामुळे वादीच्या विधीज्ञांनी दाखल केलेले न्यायनिवाडे वादीसाठी उपयुक्त ठरणारे नाहीत.

५. वादीने त्याच्या मुळ दाव्यामध्ये अतिक्रमणाबाबत कोणतीही विनंती न केल्यामुळे जर प्रस्तुत अर्ज मंजुर करुन दावा मिळकतीच्या हद्दीखुणा कायम करण्यात आल्या तर ते दाव्यामधील अंतिम मांगणी मान्य केल्यासारखे होईल आणि प्रस्तुत दावा चालविण्यास कोणत्याही पक्षाला रस राहणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करुन कोर्ट कमिशनची नियुक्ती करणे न्यायोचित ठरणार नाही. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयामध्ये जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MAYURSINGH DILIPSINGH GAUTAM

दिनांक- ०५/०७/२०२३

**(मयुरसिंह दि गौतम)**
२रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
राहुरी